# पुणे विद्यापीठ

परिपत्रक क्रमांक : २०२/२०१२

**''दि प्रेसिडेंट ऑफ इंडिया, डॉ. शंकर दयाळ शर्मा गोल्ड मेडल''** दरवर्षी विद्यापीठाच्या पदवी—प्रदान समारंभामध्ये कला, विज्ञान व वाणिज्य यापैकी एका विद्याशाखेतील गुणवंत विद्यार्थ्याला देण्यात येते.

सन २०११—१२ या शैक्षणिक वर्षासाठी हे सुवर्णपदक **कला विद्याशाखेतील** पदवी अभ्यासक्रमामध्ये शैक्षणिक गुणवत्ता, अभ्यासेतर उपक्रमातील गुणवत्ता, विशेष सामाजिक कार्य व इतर क्षेत्रातील उल्लेखनिय कार्य केलेल्या एका विद्यार्थ्यास हे सुवर्णपदक देण्यात येणार आहे.

पुणे विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयातील प्राचार्यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, सन २०११—१२ या शैक्षणिक वर्षामध्ये कला विद्याशाखेंतर्गत पदवी अभ्यासक्रमातील विशेष गुणवत्ता प्राप्त केलेल्या एका विद्यार्थ्याची शिफारस यासंदर्भातील नियम व अटींच्याअधीन राहून दिनांक १० ऑक्टोंबर, २०१२ पूर्वी पदव्युत्तर प्रवेश विभागाकडे पाठवावी. नियम व अटी सोबत जोडल्या आहेत.

उपकुलसचिव,<br>
पदव्युत्तर प्रवेश विभाग

गणेशखिंड, पुणे ४११ ००७ }<br>
संदर्भ क्र. : प.प्रवेश/४४९९ }<br>
दिनांक : २१.९.२०१२ }

# पुणे विद्यापीठ

## ''दी प्रेसिडेंट ऑफ इंडिया डॉ. शंकर दयाळ शर्मा गोल्ड मेडल'' नियम व अटी

१. सदर सुवर्णपदक पदवी परीक्षेच्या शैक्षणिक गुणवत्तेनुसार अनुक्रमे कला, विज्ञान व वाणिज्य या पैकी प्रतिवर्षी एका विद्याशाखेतील विद्यार्थ्याला देण्यात येईल.

२. विद्यापीठ अधिकार क्षेत्रातील सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांना प्रत्येकी एका विद्यार्थ्याच्या नावाची शिफारस करता येईल.

३. शिफारशींमध्ये खालील बाबींचा समावेश असावा
(अ) विद्यार्थ्याचे नाव
(ब) अभ्यासक्रमाचे नाव
(क) उत्तीर्ण झाल्याचे वर्ष
(ड) श्रेणी
(इ) महाविद्यालयातील अध्ययन काळातील वर्तवणूकीबाबतचे प्रमाणपत्र
(फ) महाविद्यालयातील नियमितपणा
(ए) महाविद्यालयातील अध्यापकांशी असणारी वर्तणूक

४. इतर कार्य :— (ऑदर ॲक्टीव्हिटीज)
(अ) खेळ
(ब) महाविद्यालयातील इतर सामाजिक कार्यातील सहभाग

५. सामाजिक कार्य (एन.एस.एस.इ.)

६. खालील गोष्टींबाबत मा. प्राचार्यांनी प्रत्येक बाबीसाठी २५ पैकी गुण द्यावयाचे आहेत.
(अ) अभ्यास
(ब) वर्तणूक
(क) इतर कार्य
(ड) सामाजिक कार्य

उपकुलसचिव
पदव्युत्तर प्रवेश विभाग